REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।


—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ६ मार्च, १९४० | अंक १०

## दी औंध स्टेट बँकिंग ॲंड इन्शुअरन्स कं. लि.

चेअरमन, संचालक मंडळ



श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर

## प्रगतीचा नवा टप्पा

रविवार, ता. १० मार्च, १९४० रोजीं सकाळीं ८॥ वा.

कंपनीचे पेट्रन औंधचे श्रीमंत राजेसाहेब
यांचे हस्तें

## स्वतःच्या नवीन इमारतीचें उद्घाटन

मूर्ती लहान
पण कीर्ती थोर !

बँकेला ६ वर्षें ६ टक्के नफा. सात महिन्यांत, २,०५,००० चे विमा अर्ज. पुरें झालेलें काम रु. १,५०,५००. म्युच्युअल कंपनीचे फायदे. संस्थानचें भक्कम संरक्षण.

जनरल मॅनेजर
श्री. आर. बी. वर्तक

इन्शुरन्स मॅनेजर
श्री. व्ही. जी. जोशी

औंध, संस्थान औंध ( द. महाराष्ट्र )

# विविध माहिती

### बँकांस सुट्टी

गुरुवार, ता. ७ मार्च रोजीं महाशिवरात्री निमित्त बँका बंद रहातील.

### आंतरराष्ट्रीय मजूर परिषद

राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय लेबर कॉन्फरन्सचें २६ वें अधिवेशन ५ जून रोजीं सुरू होईल. ह्या परिषदेस प्रत्येक समासद राष्ट्रातर्फे दोन सरकारी प्रतिनिधि, एक कारखानदारांचा प्रतिनिधि आणि एक कामगारांचा प्रतिनिधि असे चौघेजण जातात आणि त्यांचेसाठी जरूरीप्रमाणें सल्लागारहि नेमण्यांत येतात. ह्या सर्वांची निवड हिंदुस्थान सरकारच करतें. यंदाचे वर्षी सल्लागार न नेमण्याचा सरकारचा विचार आहे.

### इमारतीचें उद्घाटन

दि औंध स्टेट बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स कंपनीच्या नवीन इमारतीचें उद्घाटन ता. १० मार्च रोजीं औंधच्या राजेसाहेबांचे हस्तें होणार आहे.

### पत्रव्यवहारानें लष्करी शिक्षण

स्वीडनमध्यें सुमारें ५० हजार लोकांस पत्रव्यवहारानें लष्करी शिक्षण देण्यांत येत आहे. हे लोक लष्करांत दाखल होते वेळीं त्यांस आधुनिक युद्धपद्धतींचें सर्व ज्ञान झालेलें राहील आणि त्यामुळें पुढील तयारीचा वेळ वांचेल.

### म्हैसूरमधील कपास कापडाच्या गिरण्या

म्हैसूर संस्थानांतील आठ कपास कापडाच्या गिरण्यांत मिळून १९३८-३९ मध्यें ३ कोटि, ८५ लक्ष वार कापड तयार झालें.

### लांबीचें माप

न्यू ग्वायनामधील कांहीं स्थानिक लोकांची मोजण्याची पद्धति गमतीदार आहे. चारापर्यंत ते हाताच्या बोटांवर मोजतात पांचास ते हात म्हणतात. सहा म्हणजे एक हात आणि पहिलें बोट, ह्याप्रमाणें मोजून दहास दोन हात म्हणतात. २० म्हणजे एक मनुष्य आणि ४० म्हणजे दोन माणसें ह्याप्रमाणें ते मोजत जातात.

### जपानी मालावर बहिष्कार

जपानी मालावर बहिष्कार टाकण्याची चळवळ चीनमध्यें पुनः जोरानें सुरू झाली आहे.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १३ आ. ११ पै व्याजाचा दर

हिन्दी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारची १ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शें. १ रु. १३ आ. ११ पै पडला.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी ३१ लक्ष, ७८ हजार रुपये नफा झाला. इतका नफा तिला आतापर्यंत कोणत्याच वर्षी झाला नव्हता.

### नवीन सरकारी रेल्वेज

१९३८-३९ मध्यें सरकारनें साउथ बिहार आणि हरद्वार-डेहरा ह्या रेल्वेज विकत घेतल्या, त्यांची लांबी अनुक्रमें ७५३ मैल आणि १९ मैल भरते.

### युनायटेड इंडस्ट्रियल बँक लि.

वरील बँक कलकत्ता येथें नोंदण्यांत आली आहे. तिचें अधिकृत भांडवल १ कोटि रुपये आहे.

### ग्रेटब्रिटनमधील जर्मन लोक

ग्रेटब्रिटनमध्यें एकूण ६२,२४४ जर्मनांची आणि ११,९८९ ऑस्ट्रियनांची पोलिसांत नोंद आहे. त्यांपैकी ७३,३५३ लोकांची चौकशी-कमिटीनें छाननी केली. त्यांतील ५६९ लोकांस स्थानबद्ध केलें असून ६,७८२ लोकांस कांहीं अटीवर मोकळें सोडलें आहे. ६४,२४४ लोकांस कोणतीहि अट न घालतां मोकळें ठेवलें आहे. चौकशी कमिटीनें तपासलेल्या लोकांपैकी ५५,४५७ लोक नात्सी छळास कंटाळून ग्रेटब्रिटनमध्यें आले असल्याचें आढळलें.

### तयार साखरेपैकी दोन-तृतीयांश शिल्लक

इंडियन शुगर सिंडिकेट लि. च्या सभासद-कारखान्यांत चालू मोसमांत २७ फेब्रुवारी अखेर तयार झालेल्या साखरेपैकी ⅓ पेक्षा कमी साखर विकली गेली आहे.

### हिंदी रेल्वेजवरील उतारू

१९३८-३९ मध्यें हिंदी सरकारी रेल्वेजवर ५३ कोटि, ६ लक्ष रेल्वेचीं तिकिटें खपलीं, त्याचें उत्पन्न ३० कोटि, ३७ लक्ष रुपये आलें. १९३७-३८ मध्यें ५२ कोटि, १३ लक्ष उतारूंकडून ३१ कोटि, ८ लक्ष रुपये मिळाले होते.

### म्यूर मिल्स कं. लि.

वरील कंपनीस १९३९ मध्यें ९ लक्ष, ९ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस २०% डिव्हिडंड मिळेल. कंपनीनें २½ लक्ष रुपये अपेक्षित कर भरण्यासाठी बाजूस ठेवले आहेत. कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ३० लक्ष रुपये आहे आणि तिचे रिझर्व्ह फंडांत ४० लक्ष रुपये आहेत. प्रॉव्हिडंट, पेन्शन आणि ग्रॅच्युइटी फंडांचा या रकमेंत समावेश नाहीं. कंपनीचे भागांची किंमत त्यांच्या भरणा झालेल्या रकमेचे ४६०% आहे.

### दि एक्सप्रेस मोटार सर्व्हिस लि.

मोटार बसेस आणि लॉरीज चालविण्याचा धंदा करण्यासाठी वरील खाजगी कंपनी नोंदण्यांत आली आहे. तिचें भांडवल २ लक्ष रुपये असून रावसाहेब आर. ए. महागांवकर हे तिचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

### अमेरिकेंतील रस्ते

अमेरिकेंतील रस्त्यांची लांबी ३० लक्ष मैल असून त्यांच्या दुरुस्तीसाठी आणि सुधारणेसाठी दरसाल सुमारें ३ अब्ज रुपये खर्च येतो.

### अनेक पत्नी असलेले लोक

इजिप्तमध्यें गेल्या वर्षी गोळा केलेल्या आकड्यांवरून असें समजतें कीं, तेथें २ पत्नी असलेले ७४ हजार लोक होते. ११८ जणांच्या ३ पत्नी होत्या. १५ हजारांनीं तीनदां, १३ हजारांनीं पांच वेळां आणि ८० जणांनीं नऊ वेळां विवाह केले होते.

### ५ शिलिंग दंड

ब्रिस्टल ( इंग्लंड ) येथील एका मनुष्यास, फूटपाथवर रिकामें सिगारेटचें पाकीट टाकल्याबद्दल पांच शिलिंग दंड झाला.

### व्हिस्कीच्या पैदाशीवर नियंत्रण

व्हिस्कीची पैदास गेल्या वर्षाच्या उत्पादनाच्या एक-तृतीयांशास मर्यादित करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरवलें आहे. दारूचा पुरवठा व बाजारभाव ह्यांवर या नियंत्रणाचा परिणाम कित्येक वर्षे व्हावयाचा नाहीं असें म्हणतात.

### गोवा लॉटरींत हिंदी पैसा

गोव्यांत निघणाऱ्या लॉटरींत हिंदुस्थानचे प्रतिवर्षी वीस कोटि रुपये जातात आणि त्यांतले चौदा लक्ष रुपये परत येतात असें म्हणतात. ह्यावर उपाय योजले जाण्याविषयीं सरकारास सूचना करण्यांत आल्या असल्याचें समजतें.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ११० |
| २ हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक ... | १११ |
| ३ हिंदी साखरेच्या धंद्याच्या संरक्षणाचा इतिहास | ११२ |
| ४ स्फुट विचार ... रिझर्व्ह बँकेची लंडनवरील हुंड्यांची खरेदी-लंडनमध्यें हिंदुस्थानचा पैसा-हिंदुस्थानच्या कर्जरोख्यांची अदलाबदल-एक्सचेंज बँका आणि हिंदी विमा कंपन्या. | ११३ |
| ५ प्राप्तीवरील कर ... | ११५ |
| ६ औद्योगिक बंधे ... | ११५ |
| ७ शेतकऱ्याच्या स्थितीचें नीट निरीक्षण करा ... | ११६ |
| ८ हिंदुस्थान सरकारचें बजेट ... | ११६ |
| ९ औंध स्टेट बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स कं लि. | ११७ |
| १० रोख्यांचें रूपांतर ... | ११७ |
| ११ निवडक बाजारभाव | ११९ |



# अर्थ

बुधवार, तां. ६, मार्च १९४०


## हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जरेमी रेसमन, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मध्यवर्ती असेंब्लीस १९४०-४१ चें अंदाजपत्रक सादर केलें. सध्याच्या युद्धविषयक परिस्थितीमुळें हिंदी जनतेवर नवीन कोणत्या कराचा बोजा पडतो, ह्याकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. जादा नफ्यावरील कर आणि रेल्वे दरांतील वाढ ह्यांमुळें करवाढीच्या पूर्वतयारीचें काम झालें होतेंच. १९३९-४० मध्यें सरकारास युद्धाच्या तयारीसाठी जादा खर्च करावा लागणार, ह्यामुळें खर्च फुगून उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होणें कठीण जाईल, अशी अपेक्षा होती. लष्करी खर्च वाढला, तरी उत्पन्नहि ५ कोटि, ८ लक्ष रुपये अधिक झालें आणि बजेटाची कशीबशी तोंडमिळवणी होण्याऐवजी वर्षअखेर ९१ लक्ष रुपयांचा वाढावा राहील, असा आतां अंदाज आहे. युद्धपरिस्थितीमुळें हिंदी परराष्ट्रीय व्यापारांत आडकाठी येत असली तर कस्टम्सचें उत्पन्न अंदाजापेक्षा अधिक झालें असून एक्साइज ड्युटीपासूनहि सरकारास अधिक रकम मिळाली आहे. प्राप्तीवरील कराचें उत्पन्नहि १½ कोटींनीं वाढलें, त्याचा फायदा प्रांतिक सरकारांसहि योग्य प्रमाणांत मिळेल. दुरुस्त नीमायर योजनेस अनुसरून, इनकमटॅक्सच्या वाढत्या उत्पन्नांत प्रांतिक सरकारांस मोठा हिस्सा मिळावयाचा असून, सरकारी रेल्वेजकडून मिळणारी रकम संपूर्णपणें मध्यवर्ती बजेटांत दाखल होणार आहे. हिंदुस्थान सरकारास रेल्वेजचे आणि इनकमटॅक्सचे मिळून १३ कोटि रुपये मिळावे, अशी मूळ योजना होती. पोस्ट आणि टेलिग्रॅफ खात्याचे हिशेबांत ८६ लक्ष रुपयांचा वाढावा निघत आहे. त्यांतून पूर्वीच्या वर्षाची ७ लक्ष रुपयांची तूट वजा केली म्हणजे ७९ लक्ष रुपये उरतात, तो त्या खात्याचा रिझर्व्ह फंड समजून त्यावर त्या खात्यास व्याज दिलें जाईल. लष्करी खर्च सुमारें ३½ कोटींनीं वाढला आणि एकूण खर्चाचा आकडा ८६ कोटि, ८५ लक्ष रुपये झाला. उत्पन्न ८७ कोटि ७६ लक्ष रुपये होऊन ९१ लाखांचा वाढावा राहिला. अर्थात हे सर्व दुरुस्त अंदाजाचे आकडे आहेत. ३१ मार्चअखेरचे पक्के हिशेब होण्यास अद्याप अवकाश आहे.

१९४०-४१ मधील अपेक्षित उत्पन्न ८५ कोटि, ४३ लक्ष रुपये आहे. त्यांत रेल्वेजकडून मिळावयाच्या ५ कोटि, ३१ लक्षांचा समावेश होतो. कस्टम्स आणि एक्साइजमध्यें ४ कोटि, ७ लक्ष रुपयांची घट पडेल असा अंदाज करण्यांत आला आहे. अपेक्षित खर्च ९२ कोटि, ५९ लक्ष रुपयांचा आहे, म्हणजे बजेटांत ७ कोटि, १६ लक्ष रुपयांची तूट पडते. खर्चाचे अंदाजांत लष्करावरील ५३½ कोटि रुपयांच्या खर्चाचा समावेश होतो. रेल्वेजकडून मिळावयाची रकम ही रेल्वेजचे दर वाढवूनच जमा केली जात असल्याकारणानें ती वगळली असतां बजेटांतील तुटीचा आकडा आणखी वाढून दिसेल. अपेक्षित उत्पन्न खर्चाचे फडनवीसांनीं दिलेले आकडे खालीलप्रमाणें आहेत:—

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| उत्पन्न (रु.) | ८५ | ४३ |
| खर्च (रु.) | ९२ | ५९ |
| तूट | ७ | १६ |

ही ७ कोटि, १६ लक्ष रुपयांची तूट भरून काढण्यासाठी फडनवीसांनीं खालील योजना केली आहे:—(१) ९१ लक्ष रुपयांचा चालू वर्षांतील अपेक्षित वाढावा घेतला म्हणजे तुटीची रकम ६ कोटि, २५ लक्ष रुपये राहते. (२) जादा नफ्यावरील कराचे ३ कोटि रुपये मिळाले म्हणजे ३ कोटि, २५ लक्षांची तरतूद करावयाची शिल्लक रहाते. (३) साखरेच्या अंतर्गत उत्पादनावरील पट्टी दर हंड्रेडवेटास २ रुपये आहे ती ३ रुपये केली आणि त्या मानानें आयात जकात वाढविली म्हणजे १ कोटि, ९० लक्ष रुपये मिळतील आणि पेट्रोल करावरील पट्टी दर गॅलनास १० आणे आहे ती १२ आणे केली म्हणजे त्यापासून १ लक्ष, ४० हजार रुपये मिळतील. अशा रीतीनें एकूण उत्पन्न ९२ कोटि, ६४ लक्ष रुपये होऊन अखेर ५ लक्षांचा वाढावा उरेल. प्राप्तीवरील करांत तूर्त वाढ केलेली नसली, तरी येत्या वर्षी मध्यें केव्हां तरी ती करावी लागणार नाहीं कशावरून? अशी सूचना फडनवीसांनीं देऊन ठेविली आहे.

"चालू युद्धाच्या खर्चाचा बोजा जेवढा आजच सहन करतां येईल, तेवढा तो सहन करणें इष्ट आहे; मागाहून येणारांवर त्याचा भार शक्य तेवढा हलका राहूं देणें हाच शहाणपणाचा मार्ग आहे" असें आपल्या करवाढीच्या बजेटाचें समर्थन सर जरेमी ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. फडनवीसांनीं केलेल्या जादा नफ्यावरील कराचे उत्पन्नाचा अंदाज चुकीचा असून, तें वास्तविक ३ कोटींपेक्षा बरेंच अधिक होईल आणि खर्चांत काटकसर करण्याचा सरकारनें योग्य तो प्रयत्न केलेला नाहीं, अशी लोकांची तक्रार आहे. एकट्या जादा नफ्यावरील कराचें उत्पन्नच बजेटांतील तूट भरून काढण्यास पुरेसें होईल, अशी व्यापारीवर्गाची अपेक्षा आहे. प्राप्तीवरील कर, साखरेवरील आणि चांदीवरील ड्यूटी, इत्यादींचें उत्पन्न सरकारनें फारच कमी गृहीत धरलें असून, एकंदरीनें पहातां साखर आणि पेट्रोल ह्यांवरील कर न वाढवतां काम भागलें असतें, अशी लोकांची समजूत आहे. लष्करी खर्चांत वाढ आणि नवीन बसविण्यांत येणारे कर ह्यांस हिंदी लोकप्रतिनिधींची हार्दिक संमति मिळविण्याचा सरकारनें प्रयत्न करणें इष्ट आहे.

## हिंदी साखरेच्या धंद्याच्या संरक्षणाचा इतिहास

### एक्साइज पट्टींतील वाढ

( हिंदुस्थान सरकारनें साखरेच्या अंतर्गत उत्पादनावरील पट्टी दर हंड्रेडवेटास २ रुपये होती, ती ३ रुपये केली आहे. ह्या वाढीपासून सरकारास १ कोटि, ९० लक्ष रुपये मिळतील, अशी अपेक्षा आहे. हिंदी साखरेच्या धंद्यास दिलेल्या संरक्षणाच्या स्थित्यंतरें वरील करवाढीचें स्वरूप ध्यानांत येण्यास सहायकारक होतील. )

### संरक्षणाची पार्श्वभूमिका

हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण देण्याच्या प्रश्नाचें चौकशीचें काम टॅरिफ बोर्डाकडे प्रथम मे, १९३० मध्यें सोपविण्यांत आलें. जानेवारी, १९३१ मध्यें बोर्डाचें चौकशीचें काम संपलें. बोर्डानें आपल्या रिपोर्टांत, हिंदी साखरेच्या धंद्याची वाढ झाल्यास त्यामुळें हिंदी शेतीच्या धंद्यास मोठें सहाय होईल, ह्या मुद्यावर भर दिला होता. उसाच्या नवीन जातींच्या लागवडीस प्रारंभ झाला म्हणजे उसाचें उत्पादन वाढेल आणि त्याची साखर करण्याचा धंदा भरभराटीस आला नाहीं तर गुळाचा भाव उतरून उसाची लागवडहि कमी होऊं लागेल, असा टॅरिफ बोर्डाचा अभिप्राय होता. साखर तयार करणाऱ्या सर्व देशांतील भरमसाट उत्पादनामुळें साखरेची किंमत घसरत चालली होती आणि तिच्या आयात जकातींत सालोसाल वाढ झाली, तरी साखरेचा भाव सुधारूं शकला नाहीं. १९१६ पूर्वी साखरेच्या आयातीवर ५% जकात होती, ती त्या वर्षी १०%, १९२१ सालीं १५%, १९२२ सालीं २५% अशी करण्यांत येऊन १९२५ सालीं प्रत्येक हंड्रेडवेटास ४ रु. ८ आणे आणि १९३० सालीं ६ रुपये जकात करण्यांत आली.

हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण द्यावयाचें असल्यास १५ वर्षे पर्यंत तें दर हंड्रेडवेटास ६ रु. ९ आ. ३ पै इतकें मिळालें पाहिजे असें टॅरिफ बोर्डाचें मत पडलें. पहिलीं सात वर्षे जकात ७ रु. ४ आ. असावी आणि नंतर ती ६ रु. ४ आ. असावी, असें त्यानें सुचविलें. सबंद पंधरा वर्षे ६ रु. ९ आ. ३ पै ह्या दरानें जकात ठेवणें आणि वरीलप्रमाणें ती बसविणें ह्यांत संरक्षण सारखेंच मिळेल, असें बोर्डाचें मत होतें. सुधारलेल्या उसाच्या जातींचा पुरेसा प्रसार होऊन उसाच्या उत्पादनाची किंमत उतरण्यास बराच वेळ लागेल. ह्यासाठी संरक्षणाची मुदत दीर्घ असणें बोर्डास आवश्यक वाटलें. हिंदी साखरेचा उत्पादन खर्च उतरणें उसाचा उत्पादन खर्च कमी होत जाण्यावर अवलंबून असल्याकारणानें, उसाबाबत संशोधन करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें दरसाल किमान १० लक्ष रुपयांची ग्रँट द्यावी, अशीहि बोर्डानें शिफारस केली.

### सरचार्ज व एक्साईज ड्यूटी

१९३२ च्या शुगर इंडस्ट्री प्रोटेक्शन ॲक्टानें साखरेवरील आयात जकातीचें संरक्षक जकातींत रूपांतर करून हंड्रेडवेटास ७ रु. ४ आ. हा दर निश्चित केला. संरक्षक जकातीचा हा दर ३१ मार्च, १९३८ पर्यंत अंमलांत रहावा असें ठरलें. १९३१ च्या पुरवणी बजेटानें साखरेच्या संरक्षक जकातींत २५% वाढ करून तिचा दर हंड्रेडवेटास ९ रु. १ आ. ० पै केला, त्यामुळें हिंदी साखरेच्या कारखान्यांचे स्थापनेस आणि वाढीस अतिशय उत्तेजन मिळालें व जकातीचें उत्पन्न कमी,कमी होऊं लागलें. १९३४ सालीं सरकारनें सर्व परिस्थितीचा विचार करून, हिंदी साखरेच्या उत्पादनावर पट्टी ( एक्साइज ड्यूटी ) बसवून आपलें कमी होत चाललेलें उत्पन्न वाढविण्याचें ठरविलें आणि कारखानदारांनीं शेतकऱ्यांकडून कोणत्या किमान दरानें ऊस विकत घ्यावा, हें ठरविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस देण्याचें त्यानें निश्चित केलें. एक्साइज ड्यूटी हंड्रेडवेटास १ रु. ५ आ. ह्याप्रमाणें बसविण्यांत आली. मात्र, संरक्षक जकातींमधील १९३१ सालीं केलेली २५% ची वाढ कायम ठेवण्यांत आली.

### एक्साइज ड्यूटींत वाढ

१९३७ च्या फिनॅन्स ॲक्टानें ही एक्साइज ड्यूटी १ रु. ५ आ. ची २ रुपये केली. ही वाढ मूलतः सरकारचें उत्पन्न वाढविण्यासाठी करण्यांत आली. तरी त्यामुळें साखर कारखान्यांचीहि अयोग्य वाढ थांबेल अशी अपेक्षा होती. १९३४ सालीं १ रु. ५ आ. ह्या दरानें एक्साइज पट्टी बसविली, त्यावेळीं संरक्षक जकात सरचार्ज धरून ९ रु. १ आ. होती. म्हणजे, संरक्षणाचा प्रभावी दर ७ रु. १२ आ. झाला. १९३७ सालीं हिंदी साखर विदेशी साखरेपेक्षा किती तरी कमी दरानें विकली जात होती, तेव्हां जादा संरक्षणाचें मान कमी करण्यास हरकत नाहीं असें सरकारनें ठरवून, संरक्षक जकात त्याप्रमाणें बदलली. साखरेच्या आयातीवरील जकात ७ रु. ४ आ. कायम करून चालू अंतर्गत पट्टीची तीमध्यें भर घालण्यांत आली. म्हणजे आयात साखरेवर ९ रु. ४ आ. कर बसला आणि अंतर्गत उत्पादनास २ रुपये पट्टी द्यावी लागली. टॅरिफ बोर्डानें साखरेच्या धंद्याची चौकशी करण्यापूर्वीच सरकारनें त्या धंद्यास मिळणारें संरक्षण फाजील किंवा अपुरें आहे ह्या गोष्टीचा निश्चय करणें अनुचित आहे आणि त्यासंबंधांत सरकारनें ढवळाढवळ करणें योग्य नाहीं, अशी टीका या धोरणावर लोकांनीं केली होती.

१९३७ चे अखेर टॅरिफ बोर्डाची नेमणूक झाली, परंतु ३१ मार्च १९३८ चे पूर्वी बोर्डाच्या रिपोर्टावरील सरकारचें मत निश्चित होऊं न शकल्यामुळें, त्यावेळीं चालू असलेल्या जकाती ३१, मार्च १९३९ पर्यंत चालू रहाव्या असें ठरलें. वास्तविक साखरेवरील संरक्षक जकातीची मुदत ३१ मार्च, १९३८ रोजीं संपत होती. बोर्डाचा रिपोर्ट ३० मार्च १९३९ रोजीं प्रसिद्ध करण्यांत आला. बोर्डानें दर मणास ५ रु. ५ आ. अगर दर हंड्रेडवेटास ७ रु. ४ आ. असें संरक्षण आठ वर्षे चालू ठेवावें अशी शिफारस केली. ही आठ वर्षांची मुदत सरकारनें अमान्य करून, १ एप्रिल, १९३९ ते ३१ मार्च, १९४१ पर्यंतच तें चालू रहावें आणि १९४० सालीं ह्यासंबंधीं पुनः चौकशी करावी असें ठरविलें. बोर्डानें सुचविलेल्या दरांत सरकारनें आठ आण्यांची कपात केली आणि त्याप्रमाणें १९३९ चा शुगर इंडस्ट्री ( प्रोटेक्शन ) ॲक्ट करण्यांत आला. आतां पुनः एक्साइज ड्यूटी १ रुपयानें वाढविण्यांत येत आहे; आणि त्याबरोबर आयात जकातींतहि तितकीच वाढ करण्यांत येणार आहे.

---

### काश्मीर संस्थानांत विम्याची सक्ती

काश्मीर संस्थानांतील २० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळणाऱ्या सर्व सरकारी नोकरांस आपल्या आयुष्याचा विमा उतरण्याची सक्ती आहे. विम्याची रकम पगारावर अवलंबून रहाते. ५५ वर्षी रकम देणारा ह्यातींतील विमा सर्वांनीं उतरावयाचा असतो.

## स्फुट विचार

### रिझर्व्ह बँकेची लंडनवरील हुंड्यांची खरेदी

दरवर्षी हिंदुस्थान सरकारास लंडन येथील आपलें देणें भागवण्यासाठी (होम चार्जेस) रकमा पाठवाव्या लागतात आणि त्यांचे बाबतींत परराष्ट्रीय व्यापारावर निघणाऱ्या हुंड्यांचा उपयोग करावयाचा असल्यानें हिंदी हुंडणावळीच्या व्यवहारांस महत्त्व प्राप्त होत असतें. हुंडणावळीचा दर आणि चलन ह्यांचे संबंधानें अनेक वर्षे वाद चाललेला आहे आणि त्यांत तीव्र मतभेद उत्पन्न झाले आहेत, ह्याचें कारण हिंदुस्थानचें इंग्लंडमधील देणें व त्याकरितां लागणाऱ्या हुंड्यांच्या दराविषयींचा निश्चय करण्याची अडचण हें होय. युद्ध-परिस्थितींत परराष्ट्रीय व्यापाराची मामुली व्यवस्था बिघडते आणि देशाच्या बाहेरील येण्या-देण्यांत महत्त्वाचे फरक घडून येतात. गेल्या महायुद्धांत हिंदी चलन व हुंडणावळ ह्यांचे बाबतींत फार गोंधळ उडून गेला आणि त्यावेळीं विस्कटलेली घडी नीट बसवण्यास त्रास पडला. ह्यामुळें प्रस्तुत युद्धांत हिंदुस्थानचें परराष्ट्रीय देणें-घेणें, हुंडणावळ व चलन ह्यांचे विषयींची परिस्थिति काय आहे ह्याची माहिती होणें आवश्यक आहे. सर जरेमी रेसमन ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लीस १९४०-४१ सालाचें अंदाजपत्रक सादर केलें, त्यावरील त्यांच्या भाषणांत ही माहिती देण्यांत आली आहे. हुंडणावळ आणि चलन ह्यांची व्यवस्था पहाण्याचें काम आतां रिझर्व्ह बँकेकडे आलें आहे, हें येथें ध्यानांत बाळगणें जरूर आहे. सरकारच्या लंडनमधील देण्याघेण्याची व हुंडणावळीची तरतूद त्या बँकेनें करावयाची असते. अलीकडे हिंदुस्थानच्या निर्गत व्यापाराची चलती झाल्यानें रिझर्व्ह बँकेच्या हातीं लंडनवरील हुंड्या मोठ्या प्रमाणांत आल्या आहेत आणि त्यांचे पैसे लंडनमध्यें जमा झाले आहेत. १९३९-४० च्या पहिल्या दहा महिन्यांत रिझर्व्ह बँकेनें ५३/४ कोटि पौंड किंमतीच्या म्हणजे सुमारें ७०कोटि रुपयांच्या लंडनवरच्या हुंड्या खरेदी केल्या. गेल्या वर्षाच्या तत्सम मुदतीचा आंकडा १३/४ कोटि पौंड एवढाच होता. त्याच्या पूर्वीच्या वर्षीहि विलायती हुंड्यांची खरेदी ४ कोटि पौंडांच्या पलीकडे फारशी गेली नाहीं. ह्या रीतीनें हिंदुस्थान सरकारास लंडनमध्यें खर्चावयास पैसा लागतो, त्याची यंदा भरपूर तजवीज रिझर्व्ह बँकेच्या मार्फत झाली आहे आणि त्यासाठीं विशेष व्यवस्था करण्याची आवश्यकता राहिलेली नाहीं.

### लंडनमध्यें हिंदुस्थानचा पैसा

हुंडणावळीचा दर स्थिर राखण्यासाठी लंडनमध्यें आणि हिंदुस्थानांत व्यवहारांत लागणारें चलन व हुंड्या ह्यांचा पुरवठा रिझर्व्ह बँकेस करावा लागतो. तिनें केलेल्या विलायती हुंड्यांच्या विस्तृत खरेदीमुळें हिंदुस्थानचा विपुल पैसा लंडनमध्यें जमा झालेला आहे, त्याचा उपयोग ह्या देशाचें इंग्लंडमध्यें पौंडांच्या स्वरूपांत असलेलें कर्ज कमी करण्याकडे केला जात आहे. लंडनमध्यें जमा असलेल्या पैशाची हिंदुस्थान सरकारची गरज चालू सालीं विशिष्ट कारणांमुळें अधिकच मर्यादित झाली आहे. ब्रिटिश सरकारच्या वतीनें बरीच युद्धसामुग्री हिंदुस्थान सरकार ह्या देशांत विकत घेत असून त्या मालाची किंमत लंडनमध्यें देण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँकेच्या लंडनमधील शाखेंत हा पैसा हिंदुस्थान सरकारच्या खात्यांत जमा होत आहे. ब्रिटिश सरकारनें द्यावयाच्या लष्करी खर्चाच्या रकमा ह्याच रीतीनें त्या खात्यांत पडत आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें आपल्या मालकीची चांदी लंडनमध्यें विकण्याची व्यवस्था १९२७ सालापासून चालू केली होती, त्या व्यवहारांत सुमारें १० कोटि रुपयांची भर लंडनमधील हिंदुस्थानच्या शिलकेंत पडली आहे. ह्याप्रमाणें हिंदुस्थानचा पैसा ब्रिटिश पौंडाच्या स्वरूपांत वाढत्या प्रमाणांत विलायतेंत जमा झाला आहे. ह्या कारणानें चालू सालच्या दुरुस्त केलेल्या अंदाजपत्रकांत व पुढील वर्षाच्या बजेटांत प्रत्येकीं १३-१४ कोटि रुपये किंमतीच्या विलायती हुंड्यांची अपेक्षा असल्याचें नमूद केलें आहे. ह्याच्या मागील वर्षांत ३५ ते ५० कोटि रुपयांच्या हुंड्यांची तरतूद सरकारास करावी लागली आहे. ह्यावरून हुंडणावळीच्या बाबतींत प्रस्तुत युद्धांत कोणता महत्त्वाचा फरक झाला आहे, हें कळून येईल.

### हिंदुस्थानच्या कर्जरोख्यांची अदलाबदल

विलायती हुंड्या येथें खरेदी करून त्यांचा पैसा रिझर्व्ह बँकेनें लंडनमध्यें जमा केला आहे आणि हिंदुस्थान सरकारची बाहेर पैसा पाठवण्याची गरज मर्यादित झाली आहे हें वर सांगितलें आहे. ती बँक तेथें हुंड्या खरेदी करते, तेव्हां या व्यवहारांत आपोआप अधिक चलन देशांत खेळवलें जातें आणि कागदी चलनाच्या आधारासाठी जमवलेली गंगाजळी वाढते. पण हा पैसा लंडनमध्यें जमा होतो आणि त्यांतील फाजील रकमा योग्य रीतीनें उपयोगांत आणण्याचा प्रश्न उपस्थित होतो. हिंदुस्थान सरकारनें लंडनमध्यें तिकडील चलनांत म्हणजे पौंडांत फेडावयाचें कर्ज उभारलें आहे. हें ह्या देशाचें देणें कमी करीत आणून बाहेर पाठवाव्या लागणाऱ्या पैशाची व्यवस्था सुकर करावी अशी हिंदी लोकमताची जुनी मागणी आहे. लंडनमध्यें द्यावयाच्या देण्याचा ताण हिंदी हुंडणावळ आणि चलन ह्यांचेवर पडतो, तो दूर होण्याचा एक मार्ग, ह्या देशाचीं विलायती कर्जें कमी करणें हा आहे. त्याचा अवलंब रिझर्व्ह बँक आणि हिंदुस्थान सरकार ह्यांनीं अलीकडे केला आहे. हिंदुस्थान सरकारचीं पौंडांत काढलेलीं बिन-मुदतीचीं कर्जें आहेत, त्यांचे रोखे बाजारांत आपल्या लंडनमधील शिलकेंतून रिझर्व्ह बँकेनें खरेदी करावे आणि ते येथें सरकारच्या हवाली करण्यांत आले म्हणजे ते रद्द करण्यांत यावे अशी त्यासंबंधांतली योजना आहे. ह्या रद्द झालेल्या कर्जरोख्यांच्या ऐवजीं ३१/२ व ३ टक्क्यांचे बिनमुदत रोखे येथें बनवण्यांत येतात आणि बाजाराची गरज पाहून रिझर्व्ह बँक ते प्रचलित करते. हा अदलाबदलीचा व्यवहार चालू असतांना ३१/२ टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटांचा बाजारभाव बराच स्थिर राहिला, ह्यावरून वरील रीतीनें काढलेल्या रोख्यांस देशांत मागणी आहे, हें उघड होतें. पौंडांतले रोखे खरेदी करून त्यांचे जागीं रुपयांतले रोखे काढण्यांत खरेदी-विक्रीच्या किंमतींतल्या अनुकूल फरकामुळें सरकारास थोडासा फायदाच मिळाला आहे. हा फायदा मामुली सरकारी उत्पन्नांत जमा न होतां भांडवली हिशेबांत तो दाखल करण्यांत येत आहे. विलायतेंत गुंतलेला हिंदी पैसा स्वदेशीं परत आणण्याची आणखीहि एक योजना सरकारनें अंमलांत आणली आहे. हिंदुस्थानच्या कर्जाचे पौंडांतले रोखे धारण करणारांस त्यांची बदली रुपयांच्या स्वरूपांतील रोख्यांत करून घेण्याची सवलत

सरीस देण्यांत येणार आहे. कोणत्या भावानें ही बदली होईल ह्या विषयींच्या शर्ती रिझर्व्ह बँक वेळोवेळ बाजारांत प्रचलित असलेल्या रोख्यांच्या किंमतीस अनुलक्षून प्रसिद्ध करील. आतांपर्यंत सुमारें १२ कोटि रुपये किंमतीच्या रोख्यांची अदलाबदल झाली आहे आणि हा आकडा येत्या वर्षी बराच वाढेल अशी अपेक्षा आहे.

### एक्सचेंज बँका आणि हिंदी विमा कंपन्या

हिंदी विमा कंपन्यांनीं दिलेल्या पॉलिसी एक्सचेंज बँका मान्य करीत नाहींत. त्यामुळें हिंदी व्यापारी आणि हिंदी विमा कंपन्या ह्यांचें नुकसान होत असून, त्यांस अडचणीहि येतात अशी फार जुनी तक्रार आहे. ह्या संबंधांतील तक्रार १९२९ सालीं मध्यवर्ती आणि प्रांतिक बँकिंग कमिटीकडे करण्यांत आली होती आणि त्यानंतर एक्सचेंज बँकांनीं आपलें धोरण जरा बदललें होतें. ह्या बँका आपल्या गिऱ्हाइकांना हिंदी वगळून इतर विमा कंपन्यांच्या पॉलिसी आणण्याविषयीं सुचवितात आणि परराष्ट्रीय व्यापार सर्वस्वी विदेशी एक्सचेंज बँकांचेमार्फत होत असल्याकारणानें हिंदी व्यापाऱ्यांस दुसरा मार्गच उरत नाहीं. " ब्रिटिश " ह्या व्याख्येंत हिंदी कंपन्या बसत नाहींत असें एक्सचेंज बँकांचें म्हणणें आहे. गेलीं दहा वर्षें मोठ्या आणि जुन्या हिंदी कंपन्यांच्या पॉलिसी स्वीकारण्यांत येत असत. परंतु युद्धामुळें परिस्थिति पुनः पालटली आहे आणि हिंदुस्थानांतून जाणाऱ्या मालाबद्दलच्या हुंड्यांबरोबर ब्रिटिश विमा कंपन्यांचीच पॉलिसी असणें आतां आवश्यक झालें आहे. मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरनें ह्याबाबत हिंदुस्थान-सरकारकडे तक्रार केली आहे. हा केवळ विमा कंपन्यांच्याच हिताचा प्रश्न नसून हिंदुस्थानाच्या स्वाभिमानाचाहि तो प्रश्न आहे.

### अंदाजपत्रकांतील लष्करी खर्चाची तरतूद

१९४०–४१ मधील हिंदी लष्करी खर्चाच्या तरतुदीविषयीं माहिती फडनवीसांनीं असेंब्लींत सांगितली. हिंदुस्थान सरकार आणि ब्रिटिश सरकार ह्यांचेमध्यें, हिंदी लष्करी खर्चाचा बोजा कोणीं आणि किती उचलावा, ह्यासंबंधीं वाटाघाटी होऊन त्यांनीं एक योजना तयार केली आहे. शांततेच्या काळांत जेवढा लष्करी खर्च होतो तेवढा हिंदुस्थानानें करावा, मात्र ह्या खर्चाचा हिशेब करतांना किंमतींतील वाढ लक्षांत घ्यावी, असें ठरलें आहे. ह्याचा अर्थ, पहिल्या इतक्याच लष्करी तरतुदीसाठी आतां जरा अधिक रक्कम खर्चावी लागेल असा होतो. स्वतः होऊन हिंदुस्थानास खर्च करावा लागेल, ता अर्थात्, त्यानेंच सोसावयाचा आहे. परदेशांत हिंदी सैनिकांवर अधिक खर्च करावा लागेल, तो अखेर हिंदुस्थानाच्या संरक्षणासाठीच करावा लागणार असल्यानें त्याप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकारनें १ कोटि रुपये द्यावे, असेंहि ठरलें आहे. वरील योजनेस अनुसरून १९३९-४० च्या हिशेबांत हिंदुस्थान सरकारचा लष्करी खर्च कांहीं कोटींनीं वाढलेला दिसून येईल. तथापि हिंदी लष्करी खर्चाच्या वाढींतील कांहीं हिस्सा स्वतः सहन करण्याचें धोरण ब्रिटिश सरकारनें आखलेलें असल्याचें स्पष्ट दिसतें. नाहीं तर फडनवीसांस पुष्कळच अधिक लष्करी खर्चाची तरतूद करावी लागली असती.

### देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९३९ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ८ हजार रुपये निव्वळ नफा झाला. बँकेकडे सुमारें १९३ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेचें भरणा झालेलें भांडवल ११ लक्ष ३० हजार रुपये आहे. बँकेनें डिव्हिडंड वाटलें नाहीं, नफ्याच्या रकमेंतून घसारा, वगैरेची तरतूद केली.


## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंड्स. ...... | ३,५७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षापासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवींवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवींवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवींवर : तीन ते साडे चार टक्के. व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवींवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवींवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ६ पै ची तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रंथमाला, : : पुणें ४.

## प्राप्तीवरील कर

### १९३७–३८ सालची माहिती

हिंदुस्थान सरकारच्या प्राप्तीवरील कराच्या खात्याचा १९३७-३८ सालाबाबतचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील कांहीं मनोरंजक माहिती खाली दिली आहे. प्राप्तीवरील करास पात्र असलेल्या लोकांनीं आपल्या मिळकतीचे दिलेले आकडे खात्याच्या अधिकाऱ्यांनीं विशेष छाननी किंवा चौकशी न करतां कराच्या आकारणीसाठी तशाच्या तशाच स्वीकारले असते तर सरकारचें उत्पन्न २½ कोटि रुपयांनीं कमी झालें असतें. ज्या इसमांकडून ही जास्त रकम वसूल करण्यांत आली, त्यांचेवर झालेल्या कराचे आकारणीचा चौथा हिस्सा ही रकम होती. ह्यावरून कर चुकवूं पहाणारांकडून योग्य रकमा वसूल करण्यांत प्राप्तीवर कराच्या खात्यानें दक्षता दाखवली असें दिसून येतें. प्राप्तीचे आकडे व्यवस्थित रीतीनें सादर न करणारांच्या हिकमती उघडकीस आणल्या जाऊन त्यांस जबर भुर्दंड द्यावा लागल्याचीं उदाहरणें नमूद आहेत. कर देणारांच्या यादींत ४१ हजार नव्यानें दाखल झाले व ४९ हजार यादींतून निघाले.

प्राप्तीवरील मामुली कर व सुपर टॅक्स ह्यांची मिळून १९३७-३८ सालाबाबतची आकारणी २० कोटि रुपयांची होती. ह्यांतून द्यावयाचा रिफंड वजा जातां १७ कोटि रुपये येणें झालें आणि त्यांपैकीं १६ कोटि रुपये प्रत्यक्ष वसूल झाले. १९३६–३७ सालांत वसूल झालेली रकम ५० लाखांनीं ह्यापेक्षा कमी होती. कर देणाराची पत्नी व अज्ञान मुलें ह्यांच्या प्राप्तीचा अंतर्भाव त्याच्या स्वतःच्या प्राप्तींत केल्यामुळें ५½ लक्ष अधिक वसूल झाले.

मद्रास प्रांतांत व्यापाराची स्थिति चांगली असल्यानें कराची वसूली समाधानकारक झाली. कच्च्या मालाच्या किंमती मात्र पडल्या होत्या. कपास, तंबाखू व मोटार गाड्या ह्यांचा व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांस बरी प्राप्ति झाली. मुंबईत कपास तेजींत होती, पण वर्षअखेर भाव उतरले. एकंदरीनें पहातां कपाशीच्या व्यापाराची स्थिति चांगली नव्हती. व्याजाचे दर उतरलेले होते आणि भांडवलाचा पुरवठा विपुल होता. ह्या कारणानें घरें बांधण्याच्या धंद्यास आणि त्यास सामुग्री पुरवणारांच्या व्यवहारास तेजी होती. कित्येक सोनेचांदीच्या व्यापाऱ्यांस ठोकरा लागल्या पण विमाकंपन्यांची चलती होती. बंगालमध्यें सर्वसाधारणपणें चलतीच होती. साखर, चहा, तंबाखू, औषधें, रॉकेल वगैरे मालाचे भाव बरे होते. वीज व विमा ह्यांच्या धंद्याची प्रगति झाली. जहाजांच्या वहातुकीचा धंदा करणाऱ्या मंडळ्यांस विशेष नफा झाला नाहीं. विलायती कापडाचा व्यापार करणारांची कमाई चांगली होती. पण देशी कापडवाल्या व्यापाऱ्यांस तसें सुदैव लाभलें नाहीं.

संयुक्त प्रांतांतील साखर कारखान्यांस त्यांचें वाढते उत्पादनें व वाढती कार्यक्षमता ह्यांचे योगानें, एक्साइज पट्टी जादा लागू नहि, चांगला नफा झाला. कपाशीचा भाव उतरला व कापडाचा खाली गेला नाहीं ह्या कारणानें गिरण्यांस बरी कमाई झाली. पंजाबच्या धंद्यांची स्थितिहि समाधानकारक होती. हंगाम चांगला झाला व बाजारभावहि बरे होते. बिहार-ओरिसामध्येंहि स्थिति अनुकूल होती. मध्यप्रांतांत मात्र कपाशीचा धंदा मंदींत राहिला. कोळसा व मँगेनीजची परिस्थिति बरी होती. आसामांत चहाच्या धंद्याची स्थिति सुधारली.

आर्थिक मंदी व कर्ज निवारणाविषयींचे कायदे ह्यांमुळें कित्येक प्रांतांत सावकारवर्गाचें नुकसान झालें. खेडेगांवीं व्यापारासहि धक्का पोंचून कर्ज–तडजोडीच्या कायद्यामुळें वकील लोकांची स्थिति चांगली नव्हती. बंगालमध्यें सावकारांचें उच्चाटन होत आहे. पण त्यांची जागा सहकारी संस्थांना घेतां आलेली नाहीं. मुंबई प्रांतांतील सावकारवर्ग आपली जागा धरून आहे. सहकारी चळवळीस मोकळें असलेलें क्षेत्र अजून व्यापलें जावयाचें आहे.

## औद्योगिक बांधे

३० सप्टेंबर, १९३९ रोजीं संपलेल्या तिमाहींत ब्रिटिश हिंदुस्थानांतील एकूण ११२ औद्योगिक बांध्यांत ९८ हजार कामगारांचे १७ लक्ष, ८५ हजार कामाचे दिवस बुडाले. १९३८ च्या तत्सम मुदतींत १०५ बांध्यांत १ लक्ष, ३४ हजार कामगारांचे १५ लक्ष, ५० हजार दिवस बुडाले होते. १९३९ च्या तिसऱ्या तिमाहींतील बांध्यांपैकी कापडाच्या आणि तागाच्या गिरण्यांचा हिस्सा ४३·७% होता. ५२ बांध्यांचें मूळ कारण मजुरीच्या दराबाबत होतें. खालील तक्त्यांत बांध्यांची तपशीलवार माहिती दिली आहे:—

**बांधे—प्रांतवार आकडे**

| प्रांत | बांध्यांची संख्या | बांध्यांतील कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| आसाम | ९ | १४,०३९ | ५७२,७९२ |
| बंगाल | ४२ | ४८,७०१ | ५५९,०३६ |
| बिहार | २ | ४,४२९ | ४६,१४९ |
| मुंबई | २५ | ४,५६६ | ३५,९१६ |
| मध्यप्रांत वऱ्हाड | ६ | ३,०७० | ८१,५११ |
| मद्रास | ६ | २,३६१ | १६,८१३ |
| पंजाब | ७ | ४६४ | २०५८ |
| सिंध | १ | १५०० | १,५०० |
| संयुक्त प्रांत | १० | ११,०९९ | ४७०,११५ |
| एकूण ... | ११२ | ९८,२२९ | १७,८५,८६० |

**बांधे—उद्योगधंदेवार आकडे**

| उद्योगधंदा | बांध्यांची संख्या | बांध्यांतील कामगार | बुडालेले दिवस |
|---|---|---|---|
| कपास कापडाच्या आणि लोकरीच्या गिरण्या | ३८ | २३,५२७ | ४९४,१३२ |
| तागाच्या गिरण्या | ११ | २९,३४८ | २९५,८६६ |
| वर्कशॉप | ६ | ५ ३२३ | ४४,०१६ |
| रेल्वेज | १ | २४० | २४० |
| खाणी | ... | ... | ... |
| इतर | ५६ | ३९,७९१ | ९५१,६०६ |
| एकूण ... | ११२ | ९८,२२९ | १७,८५,८६० |

## शेतकऱ्याच्या स्थितीचें नीट निरीक्षण करा

शेतीविषयक प्रश्नांचा स्वतंत्र रीतीनें अभ्यास करून त्यासंबंधांतली वस्तुस्थितीची माहिती शास्त्रीय पद्धतीनें मांडणें आणि अशा रीतीनें हिंदी खेडेगांवीं जीवनांत सुधारणा घडून येण्यास सहाय देणें ह्या उद्देशानें दिल्ली येथें शेतीच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासकांचें एक मंडळ ( इंडिअन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल ईकॉनॉमिक्स ) स्थापन झालें आहे. शेतीच्या अर्थशास्त्रासंबंधानें आस्था वाटणारे अनेक सरकारी अधिकारी व बिनअधिकारी गृहस्थ ह्या संस्थेचे सभासद आहेत. ह्या मंडळाची पहिली परिषद दिल्ली येथें पंजाब प्रांताचे सिव्हिलियन, सर माल्कम डार्लिंग, ह्यांचे अध्यक्षतेखाली नुकतीच भरली होती. शेतीच्या धंद्याचें अर्थशास्त्र व सहकारी चळवळ ह्यांचा सर माल्कम यांचा दांडगा अभ्यास असून ह्या विषयांवर त्यांनीं ग्रंथहि लिहिले आहेत. हिंदुस्थान सरकारचे एक मंत्री, सर जगदीश प्रसाद, ह्यांनीं परिषदेच्या प्रारंभाचें भाषण केलें आणि खेडेगांवीं जीवनाची वस्तुस्थिति निःपक्षपातीपणानें व कसोशीनें अभ्यासण्याचें महत्त्व किती आहे, हें सांगितलें. जमीन धारणाच्या पद्धति, शेतीच्या मालाची विक्री, जमीनीच्या तुकड्यांचें एकीकरण, सहकारी संस्था, बाजारभावाचें नियंत्रण, शेतीच्या सुधारणेस सरकारी सहाय इत्यादि प्रमुख विषयांचा त्यांनीं उल्लेख करून त्यांचा सांगोपांग अभ्यास होण्याची आवश्यकता दाखविली. युद्धामुळें बाजारभाव चढले असतां खेडेगावी व शहरी जनता ह्यांच्या हितसंबंधांत विरोध असल्याचें दिसून आलें आहे आणि युद्धपरिस्थितीचा फायदा घेतला जात असल्यास त्यांचा परिणाम किंमतीवर किती होतो आणि तो फायदा कोणाच्या खिशांत जातो हें समजणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. बाजारभावांचें नियंत्रण केलें जावें ह्या अर्थाच्या सूचना सरकारकडे येत आहेत, ह्या दृष्टीनें शेतकऱ्यांच्या हिताचें योग्य संरक्षण होण्यासाठी सर जगदीश प्रसाद ह्यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांची छाननी शास्त्रीय रीतीनें होणें अगत्याचें आहे ह्यांत शंका नाहीं.

सर माल्कम डार्लिंग ह्यांच्या भाषणांतील पहिला मुद्दा शेतकऱ्यांच्या जीवनाची सांगोपांग व यथातथ्य माहिती मिळवण्यासंबंधाचा होता. शहरांत रहाणारे सुशिक्षित लोक आणि खेडेगांवांतले मागसलेल्या स्थितींतले लोक ह्यांच्या रहाणींत जमीन–अस्मानाचें अंतर असतें. ह्यासाठीं खेडेगावी जीवनाचें आकलन होण्यास ह्या जीवनाशीं समरस होणारे अभ्यासक आवश्यक आहेत असें सर माल्कम ह्यांनीं सांगितलें. ह्या अभ्यासकांनीं आपल्या शहरी कल्पना बाजूस ठेवून खेडवळांच्या रहाणीकडे सहानुभूतिपूर्वक पाहिलें पाहिजे. हिंदुस्थान हें खेड्यांचें राष्ट्र आहे आणि म्हणूनच खेड्यांच्या अर्थशास्त्रास येथें विशेष महत्त्व आहे. दुसऱ्या एका बाबीवर सर माल्कम यांनीं जोर दिला. ती खेडेगांवांतील एकीच्या आवश्यकतेसंबंधाची होय. आधुनिक काळांत व्यक्तिस्वातंत्र्यास महत्त्व देण्यांत येतें, पण हिंदी खेडेगांवांच्या जीवनाचा पाया परस्परावलंबन हा आहे. अलीकडच्या राजकीय आणि आर्थिक घडामोडींच्या योगानें आमच्या खेडेगांवांची जूट मोडून गेली आहे, ती पुन्हां प्रस्थापित होण्याची आवश्यकता सर माल्कम ह्यांनीं प्रतिपादली आणि ती घडवून आणण्याच्या दोन साधनांचा उल्लेख केला. पंचायती व सहकारी संस्था हीं त्यांनीं सुचवलेलीं साधनें होत. पंचायतींच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्न कांहीं प्रांतांत व संस्थानांत चालले आहेत, त्याविषयीं त्यांनीं समाधान व्यक्त केलें. शेती अर्थशास्त्र मंडळानें तिच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या इतर संस्थांशीं सहकार्य करावें असें त्यांनीं सुचवलें आणि त्यासंबंधांत येथील गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स व एकॉनॉमिक्सचा निर्देश केला ही समाधानाची गोष्ट आहे. गोखले स्कूलच्या कार्याविषयींचा उल्लेख सर माल्कम डार्लिंग ह्यांच्या भाषणांत पंजाब व बंगाल येथील बोर्ड्स ऑफ एकॉनॉमिक इन्कायरीच्या बरोबरीनें झाला हें अभिनंदनीय आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणें दिल्ली येथील मंडळाच्या हातून शेतीचा धंदा व शेतकऱ्यांचें जीवित ह्यांचे संबंधांत पद्धतशीर संशोधन होईल तर त्याचा उपयोग आमच्या खेडेगांवांतील जनतेच्या सुधारणेकडे प्रत्यक्ष रीतीनें करून घेतां येईल. नवीन निघणाऱ्या संस्थांची उपयुक्तता त्यांचे हातून होणाऱ्या व्यावहारिक व भरीव कामावर अवलंबून राहील, हें सांगावयास नको.

## हिंदुस्थान सरकारचें बजेट

| | १९३९-४० दुरुस्त अंदाज (रु.) | | १९४०-४१ अंदाज (रु.) | |
|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष |
| एकूण खर्च | ८६ | ८५ | ९२ | ५९ |
| एकूण उत्पन्न | ८७ | ७६ | ८५ | ४३ |
| वाढावा (+) अगर (तूट) | | + ९१ | − ७ | १६ |

### तूट भरून कशी काढणार ?

| | कोटि | लक्ष |
|---|---|---|
| तूट………… | ७ | १६ |
| **करवाढीचें अपेक्षित उत्पन्न** | | |
| जादा नफ्यावरील कर | ३ | ०० |
| साखरेवरील एक्साइज वाढ | १ | ९० |
| पेट्रोलवरील करवाढ | १ | ४० |
| गेल्या वर्षांतील अपेक्षित वाढावा | | ९१ |
| करवाढ……… | ७ | २१ |
| अपेक्षित वाढावा | ० | ५ |

### कपास–कापड आणि सूत ह्यांची निर्गत

मुंबई बंदरांतून १९३९ सालीं एकूण १३ कोटि, १८३ लक्ष वार कापडाची निर्गत झाली. १९३८ च्या मानानें हा आकडा १० लक्ष वारांनीं लहान आहे. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर सप्टेंबर ते डिसेंबर निर्गत मोठ्या प्रमाणावर झाली. एकूण निर्गतीपैकी ५८·३% कापड ब्रह्मदेशानें घेतलें. स्ट्रेट्स सेटलमेंट्स, इराण, इजिप्त, उत्तर आफ्रिका, चीन, इत्यादींनींहि मोठ्या प्रमाणावर हिंदी कापडाची खरेदी केली.

### सूत

१९३९ सालीं एकूण २ कोटि, ३८३ लक्ष पौंड सूत निर्गत झालें. १९३८ मध्यें २ कोटि, ९७३ लक्ष पौंड सूत परदेशीं गेलें होतें. म्हणजे, सुताची निर्गत २०% घटली. सुताच्या निर्गतीपैकी ३५% सूत ब्रह्मदेशाकडे गेलें.

## औंध स्टेट बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स क. लि., औंध

### कंपनीच्या स्थापनेचा इतिहास

१९३२ सालापर्यंत बँकिंगचें सर्व काम संस्थानाच्या सरकार-मार्फत होत असे. १९३२ सालीं राजेसाहेबांनीं ह्यासंबंधांत चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली, तिच्या शिफारसीस अनुसरून "औंध स्टेट बँक" ह्या नांवानें एक बँक काढण्याचें ठरलें. ह्या नांवाखाली बँकेचें काम १ सप्टेंबर, १९३८ पर्यंत चाललें. ह्या वेळीं बँकेचें बँकिंग आणि विमा कंपनींत रूपांतर करण्याचा कायदा संस्थानाच्या विधिमंडळानें मंजूर केला आणि औंध स्टेट बँकिंग ॲन्ड इन्शुअरन्स कंपनीची संस्थापना झाली.

### कंपनीचें बँकिंग खातें

कंपनीचें बँकिंग खातें श्री. बी. आर. वर्तक ह्यांचे नेतृत्वाखाली आहे. श्री. वर्तक ह्यांस प्रांतिक सहकारी बँकेंतील कामाचा चांगला अनुभव असून त्याचा फायदा कंपनीस मिळत आहे. कंपनी संस्थानाच्या तिजोरीचें काम करीत आहे. कंपनीच्या संस्थानांत सहा शाखा असून तिचेकडील बँकिंग खात्यांत ६३ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत आणि इतर फंडांत ४० हजारांवर रकम आहे. संस्थानांत सुमारें ८० सहकारी सोसायट्या असून कंपनी त्यांस कर्जाऊ रकमा देते. स्टँप ड्यूटी आणि रजिस्ट्रेशन फी ह्यांची कंपनीस माफी आहे. कंपनीला संस्थानाचा प्राप्तीवरील करहि द्यावा लागत नाहीं.

### विमेदारांचा फायदा

कंपनीच्या विमेदारांस दरसाल दर हजारी १० रुपये बोनस मिळाल्याखेरीज कंपनीच्या भागीदारांस विमा खात्याच्या नफ्याचा कांहींहि अंश मिळणार नाहीं, अशी आर्टिकल्स ऑफ असोसिएशन-मध्यें तरतूद आहे. त्यानंतरहि त्यांस काय मिळावें, हें नियंत्रित करण्यांत आलें आहे. म्यूच्युअल कंपनींत विमेदारांस मिळणारे फायदे ह्या कंपनींतहि मिळावे अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

### पेट्रन, अध्यक्ष व डायरेक्टर

औंधचे राजेसाहेब हे कंपनीचे पेट्रन असून मेसर्स किर्लोस्कर ब्रदर्स लि.चे श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत. श्रीमंत अप्पासाहेब पंत, बी. ए., बार ॲट लॉ, औंधचे दिवाण, हे कंपनीचे एक डायरेक्टर आहेत.

### विम्याच्या शाखेचें काम

श्री. व्ही. जी. जोशी हे विमा शाखेचे प्रमुख आहेत. त्यांस विम्याचे धंद्याची शास्त्रीय आणि व्यावहारिक अशी दोन्ही चांगली माहिती आहे. त्यांनीं बाँबे म्यूच्युअल, इंडस्ट्रिअल ॲन्ड प्रूडेन्शिअल, इत्यादि कंपन्यांत अनेक वर्षे कामाचा अनुभव मिळविलेला असून विमा गणिति, श्री. ग. स. मराठे, एम्. ए., ए. आय. ए. ह्यांच्या प्रत्यक्ष हाताखालीं काम करण्याची त्यांस संधि लाभलेली आहे.

### पहिल्या वर्षाची प्रगति

पहिल्या वर्षांतच, म्हणजे खरोखर सात महिन्यांतच, कंपनी-कडे, २,०५,००० रुपयांच्या विम्याचे अर्ज आले, त्यांपैकीं १८७ अर्जदारांस १,५०,५०० रुपयांच्या विमा पॉलिसी देण्यांत आल्या. विम्याच्या हप्त्यांचें वसूल उत्पन्न ५,७०० रुपये झालें. सात महिन्यांचे अवधींतच कंपनीला लाइफ फंड निर्माण करतां आला हें विशेष होय.

### ब्रिटिश हिंदुस्थानांतील विमेदारांस संरक्षण

१९३८ च्या विमा कायद्यानें ह्या संबंधांत पुरेशी तरतूद केलेली आहे आणि तीस अनुसरून कंपनीनें मुंबईचे सुप्रसिद्ध स्टॉक व शेअर ब्रोकर मेसर्स आर. आर. नावर आणि कंपनी ह्यांची ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपले प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली आहे.

### नवीन इमारत

कंपनीच्या नवीन इमारतीचें उद्घाटन १० मार्च रोजीं कंप-नीचे पेट्रन, औंधचे राजेसाहेब, ह्यांचे हस्तें होणार आहे. १,३०,००० रुपये भांडवलाच्या आणि ९ लक्ष रुपये खेळत्या भांडवलाच्या ह्या कंपनीची स्वतःची इमारत असणें योग्यच आहे.

---

## ब्रिटिश रोख्यांचें हिंदी रोख्यांत रूपांतर

ब्रिटिश पौंडांतील हिंदी कर्जाचें रुपयांतील रोख्यांत रूपांतर करण्याची संधी रोखेदारांस देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. पौंडांतील रोखे जेवढ्या किंमतीचे असतील तेवढ्याच किंमतीचे आणि मूळ ठरलेल्या वेळींच परतफेड ज्यांची होईल असे रुपयांतील रोखे रोखेदारांस मिळतील त्यांवर दिलेल्या व्याजावर हिंदी प्राप्तीवरील कर आकारला जाईल. ७ पौंड, १० शिलिंगाच्या रोख्याचे बदली १०० रुपयांचा रोखा मिळेल. ह्या नवीन रोख्यांस १९२० चा इंडियन सिक्युरिटीज ॲक्ट लागू होईल. रोख्यांचा नमुना रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील पब्लिक डेट ऑफिसमध्यें मिळूं शकेल. ह्या रोख्यांचे रूपांतरावर बरेच आक्षेप घेण्यांत आले आहेत आणि एकंदरीनें ही योजना हिंदुस्थानास नुकसानकारक होईल असें लोकमत व्यक्त झालें आहे. उलट, ह्या योजनेमुळें हिंदुस्थान सर-कारचें परदेशांतील देणें कमी होऊन, कर्जविषयक बाबतींत हिंदुस्थान स्वावलंबी होईल आणि हिंदी हुंडणावळीवर पडणारा ताण कमी होईल, अशीहि ह्या प्रश्नास दुसरी बाजू आहे. नवीन रोख्यांमुळें हिंदी रोख्यांची किंमत उतरेल, अशी भीति बाळग-ण्याचें कारण नाहीं. कारण बँका आणि विमा कंपन्यांस दिवसानु-दिवस ज्यास्त ज्यास्त रोखे बाळगावे लागणारच आहेत, असेंहि सांगण्यांत येत आहे.

---


अप-टु-डेट शिलाईकरितां
**महिंद्रकर ब्रदर्स**
बुधवार चौक, पुणें
**यांचेकडे चौकशी करा.**
१२ तासांत कपडे शिवून मिळतील.
खादी भांडारा-चे माडीवर

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००० चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

---

स्पृहणीय यश

## बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक- दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

## दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

---

## रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस : | बिझिनेस ऑफिस : |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ९९२A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

---

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay

716 Sadashiv Peth, Poona City

---

## K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

---

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% कन्माक लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—६ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०५—९ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९३—८ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३—११ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९२—२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७—६ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०५—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०४—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३ ) ... .. | ११०—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२०—० |
| **मंडळ्यांचे भाग** | |
| ( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. ) | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४०—८ |
| बँक ऑफ बडोदा ( १००—५० ) १०% ... ... | १०१—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६—५ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५०५—० |
| पुणें मॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११०—० |
| **वीज** | |
| पुणें ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५६२—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५६—४ |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २२१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४–१२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | १९६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४३—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | २११२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... | १२१—४ |





एजंट:—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
**किराणा व भुसार मालाचे व्यापारी**
७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स अॅकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
# दि ग्रेट सोशल लाइफ अॅन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.
**ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय**

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

**हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )**
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग,
फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

**Rs. 3 CRORES**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. घ. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ०६ आण्यांची तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,

तुळशीबागरोड : : नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें आयुर्वेद आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे सल्ल्यावरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कंबर दुखणें, अकालीं गर्भपात, होणें, शोष्यास लाभ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ३ रुपये.

श्री हेल्थ फॉरिन एजन्सीज. ( डि. ने. १ )
१५३।१ माधवविलास, शिवाजीनगर, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनी 'कुमारविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.